लोकमत

# खेळणाऱ्यांचा देश घडवू या!

क्री डा वि श्वा तू न



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

एक देश म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची दखल क्रीडाविश्वात सन्मानाने घेतली जावी, हाच या स्तंभाचा हेतू आहे.



**नवीन** वर्षाचं स्वागत करताना अनेकजण नवीन संकल्प करतात. शारीरिक वजन घटवणं हा सर्वांत जास्त लोकप्रिय संकल्प असतो. त्यानुसार, १ जानेवारीपासून अनेकजण सकाळी चालण्याचा निर्धार करतात, तर काहीजण जीममध्ये नाव नोंदवतात. परंतु, पुढे जसजशी थंडी ओसरू लागते, तसतसे सहा महिन्यांच्या आतच हे संकल्प नाहीसे होतात. क्रीडा तज्ज्ञांच्या मते, वैयक्तिक व्यायामापेक्षा सांघिक क्रीडा उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यास सातत्य टिकून राहते. चालणे, धावणे, पोहणे, सायकलिंग यांसारख्या क्रीडाप्रकारांपेक्षा मैदानी खेळांमधील खेळाडू दीर्घकाळ सराव करताना दिसतात. याचे सोपे कारण म्हणजे, संघातील खेळाडू एकमेकांना प्रोत्साहित करतात. तसेच, बऱ्याचवेळा मैदानी खेळातील खेळाडू एकमेकांवर अवलंबूनसुद्धा असतात. म्हणून क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटन खेळातील खेळाडू सातत्याने सराव करतात. शारीरिक हालचालींमुळे शरीरावर आणि मनावर होणारे परिणाम आता सर्वांनाच ठावूक आहेत. सुदैवाने खेळाविषयीची जागरूकताही व्यापक आणि सार्वजनिक झाली आहे. परंतु, एक समाज म्हणून क्रीडा क्षेत्राकडे पुरेशा गंभीरपणे बघितले जात नाही.

प्रगत देशांच्या तुलनेत भारत क्रीडा क्षेत्रात आजही पिछाडीवरच असल्याचे बघायला मिळते. अर्थात, क्रिकेट, बुद्धिबळ, बॅडमिंटन यांसारख्या काही मोजक्या क्रीडा प्रकारांचा अपवाद वगळता अन्य खेळांमध्ये जागतिक दर्जाचे खेळाडू आपल्याकडे अभावानेच बघायला मिळतात. याचे कारण, आपला देश बघ्याचा म्हणजेच प्रेक्षकांचा बनला आहे. एका सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार १०० भारतीयांपैकी केवळ दहाच लोक प्रत्यक्ष क्रीडांगणावर सक्रिय असतात आणि हेच गुणोत्तर प्रगत देशांमध्ये उलट आहे. अमेरिका, युरोपमध्ये १०० नागरिकांपैकी किमान ६० लोक खेळाडू म्हणून सक्रिय आहेत. याच नेमक्या कारणांमुळे प्रगत देश ऑलिम्पिकमध्ये पदकांची लयलूट करतात.

सध्या आपल्या सर्वांसमोर मोबाइल फोन, इंटरनेट, वाय-फाय या सर्वांचे आव्हान आहे. स्वस्तात मिळणाऱ्या करमणुकीमुळे फार मोठा वर्ग शारीरिक हालचालींपासून दूर आहे. याचे अनेक अंगाने दुरगामी दुष्परिणाम सध्या बघायला मिळतात. त्याहून कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय'मुळे तर सर्वसामान्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. 'युनायटेड नेशन्स'च्या एका पाहणीनुसार पाणी टंचाई, दारिद्र्य निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आणि यासारख्या ज्वलंत आणि गंभीर समस्यांवर रामबाण उपाय म्हणून खेळांचा उपयोग होऊ शकतो. प्रत्येक समस्येसाठी पैसाच लागतो, असे नाही. समस्यांनी ग्रस्त असलेला समाज एकत्र येऊन कुठलाही मैदानी खेळ खेळू लागला, तर तो समूह त्यांच्या जीवनाशी निगडित समस्या स्वत:च सोडवू शकतात, असे युनायटेड नेशन्सने सिद्ध करून दाखवले आहे.

भारतातील सध्याच्या असंख्य नागरी समस्यांवर खेळाद्वारे उपाय सापडणे शक्य आहे. त्यासाठी जास्तीत जास्त संख्येने दररोज प्रत्येकाने क्रीडा क्षेत्रात सक्रिय होणे गरजेचे आहे. 'लोकमत'ने पुढील वर्षभर क्रीडाविषयक स्तंभातून लिखाण करण्याची संधी दिल्यामुळे याचा उपयोग क्रीडा विषयक जनजागृती करण्याचे मी ठरवलं आहे. यामध्ये विविध खेळांविषयच्या माहितीसोबतच स्पर्धा आणि त्यांचे अर्थकारण, राजकारण याबाबतही चर्चा घडविण्याचा माझा प्रयत्न राहील. क्रीडा क्षेत्राचे होत असलेले व्यापारीकरण, किती योग्य, किती अयोग्य?, क्रीडा क्षेत्रातील अनेक पायंडे, अपुरी मैदाने याशिवाय क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या ताज्या घडामोडींचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे.